Rediffusion/Edelman

**Publication:** Punyanagri
**Date:** 12/09/2013
**Edition:** Nagpur
**Page No:** 20
**Headline:** Shouvik and Kshitiz from centre point school won Nagpur TCS IT Quiz

# टीसीएस प्रश्नमंजुषेत सेंटर पॉईंटचे शौविक-क्षितिज विजेते




**नागपूर :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे वसंतराव देशपांडे सभागृहात बुधवारी आयोजित 'टीसीएस आयटी विझ २०१३' या नागपूर विभागाच्या आयटी प्रश्नमंजुषा स्पर्धेत सेंटर पॉईंट स्कूल नागपूरचे विद्यार्थी शौविक डे आणि क्षितिज गुप्ता विजेतेपदाच्या चषकाचे मानकरी ठरले. भवन्स बी.पी. विद्या मंदिर, श्रीकृष्णनगरचे विद्यार्थी शहादाब खान आणि विश्वरूप खानोरकर यांना उपविजेतेपदाचे मानचिन्ह मिळाले. आता विजेती जोडी महाअंतिम फेरीत नागपूर विभागाचे प्रतिनिधीत्व करणार आहे. 'स्मार्ट टेक विझार्ड २०१३' हा बहुमान मिळविण्यासाठी त्यांची स्पर्धा होणार आहे. टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसचे उपाध्यक्ष व बिझनेस ऑपरेशनचे प्रमुख चैतन्य साठे, निखिल दाभोळे व राजेश परमेश्वरम यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. या प्रश्नमंजुषेत सहभागी झालेल्या अन्य शाळेची चमू - मॉडर्न स्कूल कोराडी, नारायण विद्यालय, भवन्स विद्या मंदिर सिव्हिल लाईन्स, दिल्ली पब्लिक स्कूलला प्रोत्साहन पुरस्कार देण्यात आले.